यवतमाळ वन विभागातील धामणगाव देव येथे high wire fencing च्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. निसप्र-२०१५/प्र.क्र.१९०/फ-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ४ फेब्रुवारी, २०१६

<u>वाचा</u> - १. अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य,नागपुर यांचे पत्र क्र. कक्ष -२४३/व अ/१११९/२०१५-१६, दि.५/१/२०१६.

<u>प्रस्तावना</u> -

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी दि.५/१/२०१६ च्या पत्रान्वये यवतमाळ वन विभागातील धामणगाव देव येथे २.१० mt. high wire fencing with eight row च्या बांधकामाच्या रु. ७२.७७ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

सदरहू बांधकामाच्या रु. ७२.७७ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

यवतमाळ वन विभागातील धामणगाव देव येथे यवतमाळ परिक्षेत्रातील कक्ष क्र. १५९ येथे २.१० mt. high wire fencing with eight row च्या बांधकामाच्या रु. ७२.७७ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या सहमतीच्या व खालील अटीच्या अधीन राहून, शासनाची प्रशासकीय मान्यता (वित्तीय मान्यता वगळून) प्रदान करण्यात येत आहे.

१) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करून घ्यावी.
२) यवतमाळ परिक्षेत्रातील धामणगाव देव येथील कक्ष क्र १५९ येथे २.१० mt high wire fencing with eight row चे कामासाठी उच्च व चांगल्या दर्जाचे साहित्याचा वापर करण्यात यावा तसेच सदरहू कामाचे संरक्षण व परिरक्षणासाठी उपवनसरक्षक यवतमाळ यांनी आवश्यक उपाययोजना करावी.

हे आदेश शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र. ७०/२००८/ विनियम, दि. १५ मे २००९ , वित्तीय अधिनियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग- पाच नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अंतर्गत प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार, अ.क्र.१, परिच्छेद क्र. १३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५/२०१६/इमा-३ दि. १२/१/२०१६ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२०४१५३५१००७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DHAS ANIL N

Digitally signed by DHAS ANIL N
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917247, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DHAS ANIL N
Date: 2016.02.04 15:35:24 +05'30'

(अनिल धस)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य,नागपुर
२. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य,नागपुर
३. मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ.
४. उपविभागीय वन अधिकारी,दारव्हा.
५. महालेखापाल,१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षण) मुंबई / नागपुर
६. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
७. कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय,मुंबई-३२.
९. ब-१/फ-१/फ-२ कार्यासन ,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
१०. कार्यासन फ-५, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ (निवड नस्ती).